**VISHVPRABHA VENTURES LIMITED**
(Formerly known as Vishvprabha Trading Ltd.)
Regd. Office : Ground Floor, Avighna Heights, Survey No. 45-4B, Behind Sarvoday Park, Nandivali Road, Dombivili (East) 421201
CIN : L51900MH1985PLC034965
Website : www.vishvprabhaventures.com
Email: cosec@ vishvprabhaventures.com

Date: 19/11/2022

To,
**The General Manager,**
**Depepartment of Corporate Services,**
**BSE Limited**,
P. J. Towers,
Dalal Street,
Fort, Mumbai – 400001

**BSE Scrip Code: 512064**
**Sub: Vishvprabha Ventures Ltd. bags an order of Rs.36.15 Cr. from KDMC**

Dear Sir / Ma'am

The company has received the following work order of Rs.36.15 Cr. from Kalyan-Dombivli Municipal Corporation for construction of road at within the municipal boundary of KDMC. A copy of the work order from KDMC is attached herewith for reference.

Kindly take the above on your records.

Thanking you,

Yours Truly,

**For Vishvprabha Ventures Limited**
Jas Raj Nagal
Digitally signed by Jas Raj Nagal
Date: 2022.11.19 20:35:54 +05'30'
**Jas Raj Nagal**
**Company Secretary and Compliance Officer**
MNo. : A59372
Place : Dombivli, Thane
Encl : A copy of work order

Vishvprabha Ventures Limited THANE

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

## बांधकाम विभाग, डोंबिवली

जा.क्र.कडोंमपा/काअ/बांध/डोंवि/२५६ दि.१८/११/२०२२.

प्रति,
मे. विश्वप्रभा व्हेंचर्स लि.
तळमजला, अविघ्न हाईट्स,
सर्व्हे नं. ४५/४ बी, सर्वोदय पार्क च्या मागे,
नांदिवली रोड, डोंबिवली पुर्व.

**विषय** :— मौजे व्दारली येथील साकेत कॉम्पलेक्स गेट ते आरक्षण क्र. १३ माध्यमिक शाळा साखळी क्र. ० ते १५९३ पर्यंत मंजुर विकासयोजना रस्त्याने बाधित क्षेत्राचे ॲमिनिटी ह.वि.ह.मंजुर करणे अंतर्गत विकास योजनेतील रस्ता तयार करणेबाबत.

**संदर्भ** :— १) प्राईम मॅनेजमेंट ॲण्ड कन्सल्टन्सी यांचेमार्फत दि. २४/६/२०२२ अन्वये सादर करण्यात आलेला सविस्तर प्रकल्प अहवाल.
२) मा. आयुक्त महोदय यांचे दि. ०७/११/२०२२ रोजीची मंजुरी.

उपरोक्त विषयांत नमुद मौजे व्दारली येथील साकेत कॉम्पलेक्स गेट ते आरक्षण क्र. १३ माध्यमिक शाळा पर्यंत साखळी क्र. ० ते १५९३ मी. लांबीचे व २४ मी. रुंद मंजुर विकासयोजना रस्त्याने बाधित क्षेत्राचे ॲमिनिटी ह. वि.ह.मंजुर करणे अंतर्गत विकास योजनेतील रस्ता तयार करणेबाबत प्रकल्प अहवालास अंतर्गत डी.पी.रस्ते विकसित करणेकामी महाराष्ट्र शासन अधिसुचना नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई — ३२ यांचेकडील क्र. टोपोस १८१३/३०६७/प्र.क्र.१२२/१२/मनपा कोकण/नवि — १३, दि. २९/०१/२०१६ परिच्छेद ४.२ (यु.डी.सी.पी.आर. पान क्र. २३१, नियम ११.२.५) अन्वये संदर्भ क्र. १ नुसार सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

**सदर कामात प्रामुख्याने खालील बाबींचा अंतर्भाव आहे.**
अ) रस्त्याच्या दुतर्फा आर.सी.सी.गटार व पदपथ
ब) कॉक्रीट रस्ता
क) रस्ता दुभाजक झाडे सुशोभिकरणासह
ड) दुतर्फा साईड शोल्डर पेव्हर ब्लॉकसह
इ) यु.टी.ली.टी. टक्टसाठी दुतर्फा १५० मीमी व २५० मीमी व्यासाचे पाईप
ई) रस्त्याचे विद्युतीकरणाचे कामे
उ) इतर सेवा वाहिन्यांची कामे

तांत्रिक तपासणीनंतर वरील रक्कम रु. ३६,१५,६०,४५२/— (अक्षरी रु. छत्तीस कोटी पंधरा लाख साठ हजार चारशे बावन्न मात्र) च्या सविस्तर प्रकल्प अहवालास मा. शहर अभियंता, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, यांनी क्र. २६ (२०२२—२३) दि. १२/०९/२०२२ अन्वये तांत्रिक मान्यता दिलेली आहे. तसेच नगररचना विभागामार्फत तपासणी करण्यात आलेनंतर मा. आयुक्त यांचेमार्फत दि. ०७/११/२०२२ रोजी विहीत अटी व शर्तीच्या अधीन मान्यता देण्यात आलेली आहे. सदर अटींची पुर्तता करणे आपणांस बंधनकारक आहे.

रस्त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल संदर्भात अवलंबण्याची कार्यप्रणाली व सविस्तर प्रकल्प अहवाल मंजुरीबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे असतील.
१) सविस्तर प्रकल्प अहवाल मंजुर करुन घेतले नंतर त्याप्रमाणे विकास आराखडयातील रस्ता (DP Road) शासनाचे व महानगरपालिकेचे विहीत Specification व नियमाप्रमाणे तयार करणे बंधनकारक राहील.
२) सविस्तर प्रकल्प अहवालानुसार विकास आराखडयातील रस्त्यांच्या कामे कडोंमपाचे शहर अभियंता, कार्यकारी

अभियंता, उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांचेमार्फत स्थापत्य व विद्युत कामांसाठी प्रत्येक टप्प्यावर नियंत्रण व देखरेखीखाली नियमितपणे करणे आवश्यक आहे. सदर कामांची सविस्तर मोजमापांची नोंद महापालिकेचे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांचेमार्फत मोजणी पुस्तकात करण्यात येऊन विहीत पध्दतीनुसार कार्यकारी अभियंता, शहर अभियंता यांचे तांत्रिक तपासणी व लेखापरीक्षणानंतर प्रकल्प खर्चाची रक्कम अंतिम करुन नगररचना विभागास पुढील कार्यवाहीस्तव कळविण्यात येईल.

३) प्रस्तावित कामाची शासननियमानुसार विहीत टप्प्यांवर त्रयस्थ तांत्रिक तपासणी (Third Party Audit) करण्यात येईल. यासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या पॅनेलवरील मे. टी.जी.पी. प्रोजेक्ट्स यांची नेमणुक करण्यात येत असून त्यांचे तपासणी अहवालानुसार आवश्यक कार्यवाही व पुर्तता करणे बंधनकारक राहील.

४) वरील कामांसाठी मे. टी.जी.पी. प्रोजेक्ट्स यांना महापालिकेच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे अदा करावयाची फी आपण महापालिकेकडे जमा करणे आवश्यक राहील. तसेच वरील सर्व कामांसाठी आवश्यक चाचण्या वेळोवेळी दिलेल्या सुचनांनुसार महापालिकेच्या तसेच मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतून करणे बंधनकारक राहील व याबाबतचा आवश्यक खर्च आपणांस करावा लागेल.

५) कामात सविस्तर प्रकल्प अहवालातील तरतुदीत काही तांत्रिक बदल करावयाचे असल्यास कडोंमपा तांत्रिक विभागाच्या रीतसर मंजुरीनंतरच करणे बंधनकारक राहील.

६) सदर कामाचे पुर्णत्वानंतर ०५ वर्षे देखभाल दुरुस्तीची जबाबदारी आपल्यावर राहील व तसे लेखी हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

७) सदरचे काम करतांना आवश्यक ती सुरक्षात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. रस्त्याच्या कामामुळे जिवित वा वित्तहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

८) विकास आराखडयातील (DP Road) रस्त्याचे काम सुरु करणेपुर्वी नगररचना विभागाच्या सक्षम अधिकाऱ्यांकडून DP रस्त्याची रुपरेषा/आखणी प्रत्यक्ष जागेवर करुन घेतले नंतरच कामास सुरवात करणे आवश्यक राहील.

९) आपलेकडून सादर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार आपण स्वत: रस्ता बनविणार असून त्यानुसार आपण सदर जागेचे कायदेशिर मालक/ताबेदार/भाडेकरु (Lesse) असणे आवश्यक आहे. व याची पुर्ण जबाबदारी आपल्यावर राहील.

१०) प्रकल्पासंबंधी नगररचना विभागाशी संबंधित सर्व मुद्यांची पुर्तता करणे आपणावर बंधनकारक असून त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर राहील.

११) सदर प्रकरणी शासनाच्या अधिसुचनेनुसार टी.डी.आर देणेबाबत योग्य तो निर्णय घेणे तद्अनुषंगिक कार्यवाही याची जबाबदारी नगररचना विभागाची राहील.

१२) प्रकल्प अहवालातील रस्त्याचे काम पुर्ण होईपर्यंत सर्व सुविधायुक्त कार्यालय, प्रयोगशाळा उपलब्ध करणे आवश्यक राहील.

वरील अटी व शर्तीस अनुसरुन आपल्याकडून सादर प्रकल्प अहवालास व त्यानुसार काम करणेस मान्यता देण्यात येत आहे. आपण उपरोक्त स्थापत्य कामे तसेच विद्युत कामे उपअभियंता (बांधकाम/विद्यूत) डोंबिवली विभाग यांच्या देखरेखीखाली करावे व पुढील कार्यवाहीसाठी आपण त्यांच्याशी संपर्क साधावा.
(मा. आयुक्त कडोंमपा यांची दि. ०७/११/२०२२ रोजीची मंजुरी)

Rablokare

कार्यकारी अभियंता (बांध)
डोंबिवली विभाग
कल्याण डोंबिवली महानगरपालिका

प्रत —

१. मा. आयुक्त, क.डों.म.पा. यांचे माहितीसाठी सविनय सादर.
२. मा. शहर अभियंता, क.डों.म.पा. यांचे माहितीसाठी सादर.
३. मा. सहा.संचालक, नगररचना, क.डों.म.पा. यांचे माहितीसाठी.
४. कार्यकारी अभियंता, विद्युत, क.डों.म.पा.